भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार
देवस्थान इनामाची जमिन संपादीत
झाल्यास भूसंपादन मोबदल्याचे देवस्थान
व कुळ यांच्यामध्ये विभाजन
करण्याबाबतच्या प्रचलित शासन
निर्णयात/धोरणात सुधारणा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.डीईव्ही-३५०५/३३०/प्र.क्र.४७/ल-४
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांकः - २६ जून, २००६

**शासन निर्णयः-**

महाराष्ट्र राज्यात देवस्थानांचा दैनंदिन खर्च,दिवाबत्ती, पुजा अर्चा, वार्षिक उत्सव यांचा खर्च भागावा म्हणून महाराष्ट्रातील ठिक-ठिकाणच्या देवस्थानांना देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनी दिलेल्या आहेत. या जमिनी इनाम वर्ग-३ मध्ये मोडतात. या जमिनी काही खाजगी देवस्थानाकडे आहेत. तर काही सार्वजनिक देवस्थानाकडे आहेत. सदर जमिनी संबंधीत देवस्थानाकडून खंडाने कसल्या जातात तर काही जमिनी पूर्वापार वहिवाटदार वा कुळाकडून कसल्या जातात व त्यांच्याकडून उत्पन्नाचा काही भाग देवस्थानास दिला जातो.सार्वजनिक प्रयोजनार्थ काही वेळा अशा कुळाकडून कसल्या जाणा-या जमिनी भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत, संपादीत करण्याची आवश्यकता भासते. अशा जमिनी संपादीत केल्यानंतर त्याबाबत मिळणा-या मोबदल्याचे वाटप, देवस्थान व कुळ यांच्यामध्ये कसे करावे याबाबत शासनाने शासन निर्णय क्र.डीईव्ही-२२७२/४३९२८/ल-४ दि.२८.१०.१९७५ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार देवस्थान व कुळ यांच्यामध्ये वाटप केले जात होते. या शासन निर्णयानुसार देवस्थानास सा-याच्या २०० पट इतकी रक्कम मोबदल्यातून मिळत होती. तर देवस्थानास वरीलप्रमाणे रक्कम दिल्यानंतर, उर्वरीत रक्कम कुळास मिळत होती.

वरील प्रमाण विचारात घेता, मोबदल्याच्या वाटपाचे, देवस्थान व कुळ यांच्या मधील प्रमाण व्यस्त आहे. वास्तविक सदरच्या जमिनी हया देवस्थानाकरिता असताना, अशा जमिनीच्या संपादनापोटी देवस्थानास मिळणारा मोबदला अत्यल्प आहे. मूळातच अशा प्रकरणात भूसंपादनामुळे देवस्थानाच्या उत्पन्नाचा कायमचा स्त्रोत जाणार आहे. अत्यल्प मोबदल्यात देवस्थानाचा भविष्यातील खर्च चालणे दुरापस्त होणार आहे. सबब देवस्थानास मिळणा-या, अत्यल्प मोबदल्याचे प्रमाण पहाता व भविष्यातील देवस्थानाचा खर्च निर्वेधपणे चालावा, याकरिता देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनी संपादीत झाल्यास अशा संपादीत जमिनीच्या मोबदल्याच्या देवस्थान व कुळामध्ये होणा-या वाटपाच्या प्रमाणात बदल करणे अत्यावश्यक झाले होते. त्यानुसार देवस्थान व कुळ यांच्यामधील मोबदल्याच्या वाटपाच्या प्रमाणात सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

2006
कारी कार्यालय, रत्नागिरी



- 1 JUL 2006

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार देवस्थान इनाम जमिन भूसंपादन कायदयाखाली संपादीत झाल्यानंतर व अशा जमिनीस कुळ असल्यास संपादनाच्या मोबदल्याच्या रकमेचे जमीन मालक, देवस्थान व कूळ यांचेत संपादनाच्या मोबदल्याच्या रकमेचे वाटप करण्याबाबतच्या दि.२९ ऑक्टोबर,१९७५ च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येते.

**१) भूसंपादनाच्या मोबदल्याच्या रकमेतील ५०% एवढी रक्कम देवस्थानास व ५०% एवढी रक्कम कुळास देण्यात यावी.**

**२) सदर आदेश ज्या प्रकरणात भूसंपादन निवाडा जाहीर झाला आहे, परंतु मोबदल्याच्या रकमेचे वाटप झालेले नाही, अशा प्रकरणात तसेच येथून पुढे देवस्थान इनाम जमिनीच्या भूसंपादन प्रकरणात लागू करण्यात यावेत.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रि. शं.कांबळे)**
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग